# <u>हस्तपुस्तिका -3</u>

## कार्यपूर्तीसाठी  नियम, विनियम, सूचना पुस्तिका आणि अभिलेख

(अ) **अनुज्ञापत्राचे  हस्तांतरण -**

1. पोटभाडेकरु तत्वावर हस्तांतरण
2. वैद्यकीय असमर्थतेमुळे कायदेशीर वारसा हक्क तत्वावर हस्तांतरण
3. भागिदारी रद्द झाल्यामुळे हस्तांतरण
4. परवानाधारकाचा मृत्यू इ. साठी महानगरपालिका मंडयांमधील गाळे/दुकाने चे नियमाप्रमाणे कायदेशीर वारसाहक्क तत्वावर हस्तांतरण.

स्थायी समितीच्या दि. १०/०१/१९९६ रोजीच्या ठराव क्र. १२३६ अन्वये महानगरपालिका मंडयामधील गाळे/जागा/दुकाने इत्यादींच्या अनुज्ञापत्राचे हस्तांतरण करण्यात येते.

१) **पोटभाडेकरु तत्वावर हस्तांतरण** - वरील ठरावानुसार पोटभाडेकरु तत्वावर अनुज्ञापत्राचे हस्तांतरण पोटभाडेकरुच्या नावे करावयाचे प्रस्ताव विचारात घेतले जातात. या प्रकरणामध्ये प्रस्तावित अनुज्ञापत्रधारकास अधिमूल्य/हस्तांतरण फी भरावी लागते आणि महानगरपालिका गाळा/दुकाने क्षेत्र इ. च्या हस्तांतरणासाठी नियमानुसार मंजूरी देते.

२) **कायदेशीर वारसतत्वावर हस्तांतरण** - सदर प्रकरणाचा विचार अनुज्ञापत्रधारकाच्या मृत्यूनंतर किंवा वैद्यकीय असमर्थततेच्या आधारे केला जातो. जर परवानाधारकाचा मृत्यू झाला तर, त्याच्या कायदेशीर वारसाच्या नावे परवाना हस्तांतरण करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यावेळी फक्त प्रशासकीय आकार वसूल केला जातो.

३) **भागिदारी रद्द झाल्यामुळे हस्तांतरण** - भागिदारी संबधि भागिदारी खत अथवा भागिदारी खत समाप्तीची कागदपत्रे जमा केल्यानंतर सदर प्रकरण स्थायी समितीच्या ठराव क्र.१२३६ दि १०/०१/१९९६ अन्वये अनुज्ञेय अधिमूल्य/प्रशासकीय आकार भरण्याच्या अटीवर विचारात घेतले जाते.

**(ब) विक्रेय वस्तू किंवा व्यापारात बदल आणि/किंवा जादा व्यापार इ.ची परवानगी  मिळविण्यासाठीचा नियम-**

स्थायी समिती ठराव क्र. १२३६ दि. १०.०१.१९९६ नुसार महानगरपालिका मंडयातील गाळा/दुकाने इ.वर विक्रेय वस्तू बदल करण्यास अनुज्ञापत्रधारकास नियमानुसार परवानगी देता येते. अशावेळी स्थायी समितीने मंजूर केल्याप्रमाणे प्रशासकीय आकार/अधिमूल्य वसूल केले जाते. अनुसूची जज प्रमाणे वस्तूच्या तपशीलाची यादी आणि नॉन मार्केटेबल वस्तू हया वेगळया जोडण्यात आल्या आहेत. मंडईच्या श्रेणीनुसार सर्वसाधारण अधिमूल्याचे दर ठरविण्यात आले आहेत. मंडयांमधील व्यवसायांचे 1)मार्केटेबल, 2)नॉन मार्केटेबल असे दोन भाग करण्यात आले आहेत.

त्यामध्ये मार्केटेबल ते मार्केटेबल या ग्रुपमध्ये जादा वस्तूंचा बदल करण्यात येतो. त्याकरिता अधिमूल्य आकारण्यात येत नाही. परंतु मंजूर केल्याप्रमाणे प्रशासकीय आकार घेण्यात येतो. गाळ्यावंरील व्यवसाय बदलाबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक/आदेशानुसार अनुज्ञेय असल्यास नियमानुसार विचारात घेता येतो.

**(क) बाहेरील मांसाहारी दुकाने, चिकन शॉप आणि शीतगृह यांच्या परवानगीसाठी अटी आणि शर्ती** -

1. खाजगी मंडई किंवा महानगरपालिका मंडईपासून १०० मीटर अंतराच्या आत मांस विक्रीसाठी बाह्य दुकानास परवाना देण्यात येत नाही. (याकरिता थोडया खुल्या मार्गिकेचा विचार केला जातो किंवा पद वाहतूकीचा विचार केला जातो.)
2. बाह्य मांस दुकानांकरिता एका व्यक्तीस एकापेक्षा जास्त परवाना देण्यात येईल.
3. राखीव जागेवर किंवा ज्या ठिकाणी मांसाची मागणी नाही अशा ठिकाणी परवाना मागणी करता येत नाही.
4. आरोग्याच्या मुद्दयावर जेथे योजना असेल तेथे मटण किंवा चिकन शॉप परवाना देण्यात येत नाही.
5. धार्मिकदृष्टया जागा अयोग्य असल्यास मटण/चिकन परवाना देण्यात येत नाही.
6. जर दुकान बांधलेले अस्तित्वात असेल तर संबधित विभाग कार्यालयातील सहा.अभियंता (इमारत व बांधकाम) विभागाकडून बांधकामाबाबत ना-हरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे.
7. नियोजित जागा 5 मीटरवर केशकर्तनालयापासून कोल शॉपपासून, डिस्पेंन्सरी आणि पीठाची गिरणीपासून आढळल्यास परवाना रद्द होतो.
8. बाह्य मटण/बीफ दुकानाची रुंदी कमीत कमी १०' असावी व क्षेत्रफळ कमीत कमी १०० चौ.फूट असावे तसेच चिकन विक्रीच्या दुकानाची रुंदी कमीत कमी ६' असावी व क्षेत्रफळ कमीत कमी ५० चौ.फूट असावे.
9. धार्मिक जागेपासून, शैक्षणिक संस्थापासून ५० मीटर अंतरावर असल्यास परवाना रद्द करण्यात येतो.
10. नियोजित परवान्यासाठी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करावे लागते की, महापालिकेला आवश्यकता लागल्यास, दुकानाचे बांधकाम स्वखर्चाने काढून टाकण्यात येईल व दुकानधारक कोणत्याही खर्चाची मागणी करणार नाहीत किंवा पर्यायी जागेची मागणी करणार नाहीत.

**<u>आवश्यकता -</u>**

1. परवानाधारक शॉप आरोग्यदृष्टया चांगल्या सुस्थितीत ठेवतील. टाकाऊ वस्तू टाकण्यासाठी मेटाप्लास्टीक डस्टबीन शॉपच्या ठिकाणी ठेवतील आणि ती महापालिकेच्या कचरा गाडीमध्ये खाली करतील. परवानाधारक कचरा निर्मूलन आकार संबंधित खात्यास देतील आणि इतर खात्याचा कर देतील.

2. परवानाधारक उच्च दर्जाचे तंदूर स्टोन किंवा मार्बल किंवा टाईल्स तयार केलेले प्लॅटफॉर्म मटण ठेवण्यासाठी ग्राहकांना वितरण करण्यासाठी वापरणे आवश्यक आहे.
3. दुकानाच्या जमीनीवर सिमेंट कॉन्क्रीट करणे आणि पृष्ठभाग गुळगुळीत करणे आवश्यक येईल.
4. दुकानाची विभागणी दोन भागात करुन बाहेरील विभाग हा काऊंटरकरिता व पिंजरे ठेवण्यासाठी (कोंबडी दुकानाकरिता) व आतील भाग कोंबडी कापण्याकरिता ठेवणे आवश्यक आहे. आतील भाग दुकानाच्या बाहेरुन येणा-जाणा-यांना दर्शनी नसावा.
5. दुकानाची भिंत गुळगुळीत राहील. भिंतीला जमिनीपासून २.५ मीटर उंचीवर रंग लावण्यात येईल असे दोन वर्षापासून एक वेळ करण्यात येईल. तसेच त्यावरील सिलींगपर्यंतचा भाग तीन महिन्यातून एकदा किंवा आवश्यकता असल्यास त्याआधी लाईम वॉश करावा. लाकडी काम आणि सिलींग देखील ऑईल पेन्टने दोन वर्षातून एकदा किंवा आवश्यकता असल्यास त्याआधी किंवा बाजार खात्याच्या अधिका-याने सुचविल्यानुसार करणे आवश्यक आहे.
6. दुकान चांगल्या स्थितीत ठेवणे, दुकान दररोज धुवणे आणि दुकानाचा व्यवसाय संपल्यानंतर किटकनाशक फवारणी करुन दुकान स्वच्छ करणे आवश्यक आहे.
7. परवानाधारक दुकानामध्ये न्हाणीघर किंवा साफसफाईची जागा ठेवण्यात येईल आणि महापालिकेचे गटार स्वच्छ ठेवतील. परवानाधारक साठवण टॅक शॉपकरिता ठेवतील आणि शॉप स्वच्छ ठेवतील.
8. दुकानामध्ये हवा खेळती राहण्यासाठी दरवाजे, खिडक्या इ. ची व्यवस्था करतील व कोंबड्या ठेवण्यासाठी दुकानाच्या समोर ५' X २' आकारमानाचा पिंजरा ठेवतील.
9. दुकानाचा वापर राहण्यासाठी किंवा इतर व्यवसायाकरिता करता येणार नाही.
10. परवानाधारक दोन चॉपिंग ब्लॉक ठेवतील किंवा कुडास ठेवतील आणि ते दिवसाचे काम संपल्यानंतर स्वच्छ करुन ठेवतील.
11. परवानाधारक पिंज-यासमोर १ फूट जागा दुकानाच्या आतमध्ये ग्राहकांसाठी ठेवतील.
12. चिकन दुकानाचे परवानाधारक दुकानातील रक्त वाहून नेण्याकरिता योग्यरित्या २'X२' आकारमानाच्या गटाराची व्यवस्था करतील.
13. कुत्रे, मांजर, पक्षी आणि इतर पाळीव प्राणी यांना दुकानामध्ये प्रवेश देता येणार नाही.
14. सहाय्यक अभियंता यांनी दिलेला ना हरकत दाखला गटार खाते आणि पाणी खाते यांना सादर करावा लागेल.
15. धर्मस्थळापासून २५ मीटर अंतरावर असल्यास, परवाना रद्द करण्यात येईल.(दुकानाच्या हद्दीपासून गाडया जाण्या-येण्याकरिता योगय जागा खुली ठेवण्यात येईल.)
16. राहण्याच्या जागेच्या २५ मीटर अंतरामध्ये दुकान असल्यास, त्याचा परवाना रद्द करण्यात येईल किंवा इतर काही कारण असल्यास, परवाना रद्द करण्यात येईल.
17. राखीव जागेवर मांस ठेवण्यासाठी किंवा कापण्यासाठी परवाना देण्यात येणार नाही.
18. लोकांचा सक्त विरोध असल्यास परवाना देण्यात येणार नाही.
19. केशकर्तनालय दुकानापासून ५ मीटर अंतरावर असल्यास किंवा कोल शॉप, पिठाची गिरणी आणि दवाखाना इ. पासून ५ मीटर अंतरावर असल्यास परवाना रद्द करण्यात येईल.

20.प्रस्तावित दुकान अर्जदाराच्या मालकीचे नसल्यास जमीन मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अथवा जागा मालकीची असल्यास विद्युत देयक व इतर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**(ड) मंडई इमारत तसेच महानगरपालिका मंडयांमधील वैयक्तिक दुकान/गाळयासाठी निविदेच्या अटी आणि शर्ती.**

*सहाय्यक आयुक्त (बाजार) खात्याच्या कार्यालयात वेगवेगळे बुकलेट उपलब्ध आहेत.*

★★★★★